# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी / फॅक्स : २५६५६२३४, E-Mail : ropune@dtemaharashtra.gov.in; Website : www.ropune.org.in

जा.क्र.विकापु/आस्था-१/ॲक्रिडेशन/२०१९/३७४४ दिनांक : ११/०९/२०१९

प्रति,
प्राचार्य,
**सर्व शासकीय तंत्रनिकेतने,**
पुणे विभाग

**विषय :- एनबीए ॲक्रिडेशन करीता प्रतिनियुक्ती सेवा वर्ग करणेबाबत**
**संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र. ४अ/आस्था/२०१९/४४१, दि. ११/०९/२०१९**

उपरोक्त विषयान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय तंत्रनिकेतने यांना कळविण्यात येते की संदर्भीय पत्राचे अवलोकन करण्यात येवून **सोबतच्या प्रपत्रात संस्थेतील अध्यापकांची** माहिती विद्याशाखानिहाय सादर करावी. सदरची माहिती **MS-EXCEL SHEET** मध्ये **DV-TTYOGESH FONT** चा उपयोग करुन सॉफ्ट कॉपी **तात्काळ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावी.**

**प्रपत्र**

| संस्थेचे नाव | विद्याशाखा | आवश्यक अध्यापक संख्या | उपलब्ध अध्यापक संख्या | प्रतिनियुक्तीने इतरत्र सेवा वर्ग करावयाची अध्यापक संख्या | प्रतिनियुक्तीने इतरत्र सेवावर्ग करावयाच्या अध्यापकांचे नाव व संस्थानिहाय पसंती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

**अध्यापकांची माहिती सादर करतांना खालील मुद्दे विचारात घेण्यात यावेत.**

१. सन २०१९-२० करीता विद्याशाखानिहाय झालेले प्रवेश व मागील ३ वर्षातील प्रवेशित विद्यार्थी संख्या
२. एखाद्या विद्याशाखेतील अध्यापकास शैक्षणिक कार्यभार नसला तरी सदरचे अध्यापक अन्य विद्याशाखेचे शैक्षणिक कार्यभार घेवू शकत असल्यास अशा अध्यापकांच्या सेवा वर्ग करण्यात येवू नयेत.
३. प्रतिनियुक्तीने सेवा वर्ग करतानांचे सदर विद्याशाखेतील अध्यापकांची स्थानिक सेवाज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता विचारात घ्यावी. **(सेवाज्येष्ठतेमध्ये प्रथम क्रमांकावर वरील अध्यापकांच्या सेवा वर्ग करणेसाठी प्रस्तावित करावयात.)**

Gaikwad 11.9.19

f प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी – ०२२- ६८५९७४७३/४२४/४३४,
E-mail : desk[illegible]@dtemaharashtra.gov.in Web : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : ४अ/आस्था/२०१९/449
दिनांक : 11 SEP 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद /नाशिक / अमरावती

विषय : एनबीए ॲक्रिडेशन करीता प्रतिनियुक्ती सेवा वर्ग करण्याबाबत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली सर्व शासकीय तंत्रनिकेतनाने एनबीए ॲक्रिडेशन करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या विभागातील किती संस्थानी एनबीए ॲक्रिडेशनकरीता प्रस्ताव सादर केला. तसेच सदर ॲक्रिडेशनकरताना शिक्षकीय पदाची कमतरता कोणत्या संस्थेत भासत आहे, त्यासंस्थेत आपल्या विभागातील अन्य संस्थेतून शिक्षकांच्या सेवा प्रतिनियुक्तीने वर्ग करता येतील, यासंबंधीची माहिती २ दिवसात संचालनालयास सादर करावी.

सदर माहिती सादर करतांना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. सन २०१९-२० करीता विद्याशाखानिहाय झालेले प्रवेश व मागिल ३ वर्षातील प्रवेशित विद्यार्थी.
२. एखादया विद्याशाखेतील अध्यापकास शैक्षणिक कार्यभार नसला तरी सदरचे अध्यापक अन्य विद्याशाखेचे शैक्षणिक कार्यभार घेऊ शकत असल्यास अश्या अध्यापकांच्या सेवा वर्ग करण्यात येऊ नयेत.
३. प्रतिनियुक्तीने सेवा वर्ग करताना सदर विद्याशाखेतील अध्यापकांची स्थानिक सेवाजेष्ठता, शैक्षणिक अर्हता विचारात घेण्यात यावी. सदरची माहिती खालील प्रपत्रात सादर करावी.

| अनु. क्र. | विभागीय कार्यालयाचे नाव | प्रवेशित विद्यार्थी संख्येनुसार अध्यापकांची सेवा वर्ग करावयाची संस्था / संख्या | | | प्रतिनियुक्तीने वर्ग करावयाची संस्था | सेवा वर्ग करावयाची अध्यापकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्थचे नाव | विद्याशाखा | अध्यापकांची संख्या | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
11 SEP 2019

आस्था-१

(डॉ. अभय वाघ)
संचालक,